MHWS100010582022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०६.०७.२०२२. | | |
| नोंदणी तारीख | : | ०६.०७.२०२२. | | |
| निकाल तारीख | : | १३.०४.२०२६. | | |
| कालावधी | : | वर्षे | महिने | दिवस |
| | | **०३** | **०९** | **०७** |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालेगांव, तालुका मालेगांव, जिल्हा वाशिम यांचे न्यायालयात

## ( पीठासीन अधिकारी : अ. सु. कोष्टी )

**नियमित फौजदारी प्रकरण क्र. १९८/२०२२**

**निशाण क्र. ५३**

**गुन्हा नोंद क्र. ३९०/२०२१**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/तक्रारदार** | | **महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस निरीक्षक,**<br>**मालेगांव पोलीस स्टेशन,** ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता **सौ.एस.पी.सरकटे** |
| **आरोपीं** | १. | **किरण घमराव राठोड,** वय वर्षे २६, |
| | २. | **सुरज घमराव राठोड,** वय वर्षे २३, |
| | ३. | **घमराव काशीराम राठोड,** वय वर्षे ५०,<br>सर्व रा. देवठाणा खांब, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | **श्री. के.डी.चतरकर.** |

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०९.०९.२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | : | १०.०९.२०२१ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | ०३.०७.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | ३०.०८.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | ३०.०८.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १३.०४.२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| क्र. | आरोपीचे नांव | अटक/नोटीस दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | किरण घमराव राठोड, | १०.०९.२०२१ | ११.०९.२०२१. | ३५४, ४५२, ३२६ व ३२३ सह ३४ भा.दं.स.प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | सुरज घमराव राठोड | १०.०९.२०२१ | ११.०९.२०२१. | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| ३. | घमराव काशीराम राठोड | १०.०९.२०२१ | ११.०९.२०२१. | | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | पीडित महिला | फिर्यादी | ३९ |
| २. | संजय देविदास राठोड | साक्षीदार | ४० |
| ३. | सौ.मंदा संजय राठोड | साक्षीदार | ४१ |
| ४. | संजय आकाराम पवार | पंच साक्षीदार | ४३ |
| ५. | राम रमेश आढे | साक्षीदार | ४४ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार–**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |

## <u>न्यायनिर्णय</u>

**( आज दिनांक दि. १३.०४.२०२६ ई. रोजी घोषीत )**

प्रस्तुत प्रकरणी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ४५२, ३२६, ३२३, ३४ अन्वये पात्र गुन्हा केलेच्या आरोपाखालील खटल्यास सामोरे जात आहे.

**<u>अभियोगपक्षाचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणे आहे</u>.**

०२. फिर्यादीने फिर्यादी दिली की, तिचे लग्न दोन वर्षापुर्वी त्यांच्या गावात राहणारा आकाश राठोड याचेसोबत झाले व त्यांच्या घरी त्यांचे सासरे संजय राठोड, सासु मंदा राठोड, मोठे जेठ अजय राठोड, जेठाणी शुभांगी राठोड व त्यांचे पती असे एकत्र राहत असुन त्यांचे व त्यांची बहिण सपना हिचे सासर व माहेर हे ग्राम देवठाणा खांब आहे. काही महिन्यापुर्वी आरोपी किरण राठोड याने फिर्यादीची बहिण सपना हिला पळवुन नेले. ते दोघे पुणे येथे राहत असतांना सपना व किरण याच्यात झालेल्या वादामुळे आरोपी किरण गावात आला. फिर्यादीचे वडील पुणे येथे मजुरीचे काम करीत असल्यामुळे फिर्यादीची बहीण सपना तेव्हापासून वडिलांकडेच राहत असुन सपना हिला फिर्यादी व तिच्या घरचे सहकार्य करतात व त्याचेविरुध्द भड़कावितात असे आरोपी किरण याला वाटत असल्यामुळे त्याचा फिर्यादीवर खुप राग असुन तो फिर्यादीकडे वाईट नजरेने बघतो.

०३. दिनांक ०९.०९.२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता फिर्यादी घरातील समोरच्या ओसरीत एकटीच स्वयंपाक करीत असतांना आरोपी किरण याने फिर्यादीच्या घरात घुसून उजवा हात धरुन फिर्यादीला खाली पाडून अंगावर बसला व दोन्ही हाताने फिर्यादीची छाती दाबून मानेवर मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीने आरडाओरड केल्यामुळे फिर्यादीची सासु व जेठाणी घरातुन बाहेर आल्या व त्यांनी आरोपीला ओढुन बाजुला केले. तेव्हा आरोपी किरण याने फिर्यादीच सासुचे केस धरून उजव्या हाताचे करंगळीवर काडीने मारले. तिथुन पळुन जात असतांना फिर्यादीचे सासरे संजय राठोड व भाऊ राम आड़े आले यांनी आरोपी किरण याला पकडले असता तेवढ्यात आरोपी घमराव व सुरज आले. आरोपी सुरज याने एक ब्लेड सारखे धारदार शस्त्र किरणच्या हातात दिले व आरोपी घमराव *"आम्ही तुझ्या पाठीसी आहे मार या सर्वांना"* असे किरण याला म्हणाला. आरोपी किरण याचे वडील व भावांनी फिर्यादीचा भाऊ राम याला पकडले व आरोपी किरण याने फिर्यादीच्या भावाच्या गालावर डाव्या बाजुला तसेच

डाव्या बाजुचे कमरेवर ब्लेड सारखे धारदार शस्त्राने मारहाण करून जखमी केले. त्यावेळी फिर्यादीचे सासरे सोडवायला गेले असता तिन्ही आरोपींनी त्यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले व आरोपी तिथुन पळून गेले. आरोपीच्या उपरोक्त कृत्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली.

०४. फिर्यादीवरुन पोलीस ठाणे, मालेगांव यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ४५२, ३२६, ३२३ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याच्या आरोपाखाली गुन्हा रजि. क्र. ०३९०/२०२१ दाखल केला. तपासाअंती आरोपींविरुध्द भा.दं.सं.प्रमाणे ३५४, ४५२, ३२६, ३२३, ३४ अन्वये गुन्हा केल्या प्रकरणी आरोपपत्र सादर करण्यात आले.

०५. त्यानंतर आरोपीविरुध्द निशाण क्र.३० वर भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ४५२, ३२६, ३२३, सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यासाठी आरोप निश्चीत केले. आरोपीला ते मराठीत समजावून सांगितले असता आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून प्रकरणात सुनावणी घेण्याची मागणी केली.

०६. माझ्यासमोर उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. दिनांक ०९.०९.२०२१ रोजी सांयकाळी ०५.३० च्या सुमारास ग्राम देवठाणा खांब, ता. मालेगांव येथे आरोपी क्र.१ ने फिर्यादीची छाती दाबुन फिर्यादीचा विनयभंग करून फौजदारीपात्र बलप्रयोग केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| २. वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ ने अनाधिकृतरित्या फिर्यादी घरात एकटी असतांना त्यांच्या घरात गृह अतिक्रमण केले हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ३. वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ ने ब्लेड सारख्या दिसणा–या धारदार शस्त्राने फिर्यादीच्या भावाच्या गालावर डाव्या बाजुला, डाव्या बाजुने कमरेवर मारुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत | **नकारार्थी** |

केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ?

| | |
|---|---|
| ४. वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ३ यांनी संगनमत करुन फिर्यादीच्या सासुचे केस धरुन त्यांच्या उजव्या हाताचे करंगळीवर व सास–याच्या डोक्यात काडीने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| ५. काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या अनुषंगाने</u> :**

०७. प्रस्तुतचे मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत चर्चीले आहेत. अभियोगपक्षाने आपले म्हणणे सिध्द करण्यासाठी केवळ पीडीत साक्षीदार फिर्यादीची साक्ष नोंदविली आहे.

०८. अ.सा.क्र.१ फिर्यादीची साक्ष निशाणी क्र. ३९ वर नोंदवली आहे. फिर्यादीने तिच्या साक्षीमध्ये त्या सर्व आरोपींना ओळखत असल्याचे, घटना संध्याकाळी अंदाजे ०५.०० च्या सुमारास त्यांच्या घराजवळ घडल्याचे, त्यादिवशी त्यांची, त्यांचे सासुसासरे व भाऊ या सर्वांची आरोपींसोबत बोलचाल झाल्याचे, याव्यतिरीक्त काहीही झाले नसल्याचे, त्यांनी रागाच्या भरात आरोपींविरुध्द पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिल्याचे व त्यावर त्यांचा निशाणी अंगठा असुन तो त्या ओळखत असून त्यातील मजकुर त्यांना सांगता येत नसल्याचे व पोलीसांनी त्यांना वाचुन दाखविला नसल्याचे कथन केले. तसेच दिनांक ०९.०९.२०२१ रोजी आरोपी क्र.१ किरण याने त्यांच्या घरात घुसुन त्यांचा विनयभंग केल्याचे, ब्लेड सारख्या धारदार शस्त्राने त्यांच्या भावाच्या गालावर व कमरेवर मारुन त्याला जखमी केल्याचे तसेच त्यांचे सासुचे केस धरून त्यांच्या करंगळीवर व सास–याच्या डोक्यात काडीने मारहाण करून जखमी केलयाचे स्पष्टपणे नाकारले आहे. फिर्यादी ही अभियोगपक्षास साथ देत नसल्यामुळे तिची उलटतपासणी घेण्यात आली. उलटतपासणीमध्ये विचारण्यात आलेल्या सर्व उत्तर सुचक प्रश्नांना फिर्यादीने नकारात्मक उत्तरे दिलेली आहेत. तसेच, फिर्यादीने आरोपीसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याची बाब देखील मान्य केलेली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाला व पुराव्यास दुजोरा व पुष्टी देणारा सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

०९. त्यानंतर तपासण्यात आलेले जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार संजय देविदास राठोड (अ.सा.क्र.२), सौ. मंदा संजय राठोड (अ.सा.क्र.३) व राम रमेश आडे (अ.सा.क्र.५) यांनी त्यांच्या साक्षीत ते आरोपींना व फिर्यादीला ओळखत असल्याचे, घटना दोन ते तीन वर्षापुर्वी घडल्याचे, त्यादिवशी फिर्यादीची व आरोपींची बोलचाल झाल्याचे व याव्यतिरीक्त त्यांना काहीही माहिती नसल्याचे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास साथ देत नसल्यामुळे त्यांची उलटतपासणी घेण्यात आली. उलटतपासणीमध्ये विचारण्यात आलेल्या उत्तर सुचक प्रश्नांना साक्षीदार यांनी नकारात्मक उत्तरे दिली आहेत. तसेच, साक्षीदाराची आरोपींसोबत समजुत झाली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाला व पुराव्यास दुजोरा व पुष्टी देणारा सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०. साक्षीदार क्र.०४ संजय आकाराम पवार (नि.क्र.४३) यांची घटनास्थळ पंच म्हणुन साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने सरतपासात कथन केले की, दि. १०.०९.२०२१ रोजी पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामासाठी किरण राठोड यांच्या घरासमोर बोलविले नसल्याचे, तिथे पंचनामा चालू होता व त्यावर त्यांनी सही केल्याचे कथन केले. घटनास्थळ जप्ती पंचनामा वरील अ.क्र.०१ वर त्यांची सही असल्याचे, परंतु त्यातील मजकूर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले. साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केलेले नसल्याने विद्वान सहा.सरकारी अभियोक्ता यांनी कसुन उलटतपास घेतला. मात्र अभियोग पक्षाला सहाय्यभुत होईल असा सबळ पुरावा पटलावर आला नाही. सबब, पंच साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षाला उपयुक्त ठरत नाही.

११. एकंदरीत अभिलेखावरील दाखल साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादीची आरोपींसोबत तडजोड झाली असल्याचे नि.क्र. ३८ वरील तडजोड नाम्यावरुन दिसुन येते. त्यामुळे नि.क्र. १ वर आदेश पारित करुन पुरावा बंद करण्यात आलेला आहे. या सर्व उणीवांमुळे अभियोगपक्षाचे कथित घटनेच्या कथनाविषयी शंका उपस्थित होते व त्याचबरोबर पुराव्याअभावी सदर कथन संशयापलिकडे सिध्द होणे हे अशक्यप्राय असल्याचे दिसुन येते. सबब, संपुर्ण पुरावा पहाता तो आरोपींविरुध्द निश्चीत केलेले दोषारोप शंकेपलिकडे सिध्द करण्यासाठी पुरेसा नसल्याचे दिसुन येते व त्याचबरोबर पुराव्याअभावी सदरची कथने सिध्द होत नाहीत. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**मुद्दा क्र.५ च्या अनुषंगाने :–**

१२. मुद्दा क्र. १ ते ४ च्या नकारार्थी उत्तरादाखल आरोपींना भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ४५२, ३२६, ३२३ सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केलेच्या आरोपातून मुक्त करावे लागेल. प्रस्तुत प्रकरणामध्ये जप्त करण्यात आलेला एक विजय कंपनीचा स्टेनलेस स्टीलचा ब्लेड व एक ६४ सेमी लांबीची लाकडी काठी मुल्यहीन असल्याने नाश करावा लागेल. उपरोक्त सर्व कारणांस्तव मी मुद्दा क्र.५ चे उत्तर त्याप्रमाणे दिलेले आहे व खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी **क्र.१ ते ३** नामे **किरण घमराव राठोड, सुरज घमराव राठोड** व **घमराव काशीराम राठोड** यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ४५२, ३२६, ३२३ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केलेच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींनी मा. अपेलेट न्यायालयासमोर हजर राहण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये **१५,०००/–** ( अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार मात्र) **प्रत्येकी** वैयक्तिक जातमुचलका व जामीनकतबा सहा महिन्यांच्या कालावधीकरिता सादर करावे. आरोपीचे सदर बंधपत्र सहा महिन्यांच्या कालावधीनंतर रद्द समजण्यात यावे.

३. अपिल कालावधी नंतर जप्त करण्यात आलेला एक विजय कंपनीचा स्टेनलेस स्टीलचा ब्लेड व एक ६४ सेमी लांबीची लाकडी काठी मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

( खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित केला )

AMIT SUNIL KOSHTI
Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.04.13 17:24:21 +0530

स्थळ : मालेगांव.
दिनांक : १३.०४.२०२६.

**[ अ. सु. कोष्टी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय क्र.२
मालेगांव, जि. वाशिम.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Judgment **:-** | | |
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B.Patange (L.G.)** |
| 2. Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon |
| 3. Judgment dated | :- | 13.04.2026. |
| 3. Judgment Signed by the P.O. | :- | 13.04.2026. |
| 4. Judgment uploaded on | :- | 13.04.2026. |